REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 7 | APRIL - 2018

# "कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखान्याच्या साखर उत्पादन व उतारा प्रवृत्तीचा अभ्यास " 2006-07 ते 2015-2016




डॉ. बी. आर. गायकवाड[१] व प्रा. के. एम. नवखंडे[२]
[१]अर्थशास्त्र विभाग प्रमुख, मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना.
[२]सहायक प्राध्यापक, मॉडेल कॉलेज, घनसावंगी, जि. जालना

## प्रस्तावना:

महाराष्ट्र हे कृषी प्रधान राज्य असल्यामुळे कृषी क्षेत्रातील सहकारी तत्वावर उभी असलेली साखर कारखानदारी ग्रामीण विकासाची केद्रबिंदू ठरली आहे.या सहकारी चळवळीमुळे ग्रामीण भागात शेती,उदयोग,शिक्षण,रस्ते,दळणवळण,सामाजिक व सांस्कृतीक बाबामध्ये मोठया प्रमाणात वृद्वधी  झाली. महाराष्ट्र राज्यात सहकारी साखर कारखानदारी ही राज्याच्या आर्थिक सामाजिक, सांस्कृतीक व राजकीय विकासाची प्रतिक ठरलेली आहे.राज्यात पहिला सहकारी साखर कारखाना प्रवरानगर ता.श्रीरामपुर येथे 1948 ला 'प्रवरा सहकारी साखर कारखाना 'या नावाने सुरु झाला. या सहकारी साखार कारखान्याच्या यशाने राज्यातल्या उस उत्पादकामध्ये  अधिकाधिक सहकारी साखर कारखाने संघटीत करण्याची प्रचंड प्रेरणा निर्माण झाली. अशा परिस्थितीमध्ये साखर उद्योग हा ग्रामीण क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणावरील सुसंघटीत असा एकमेव उद्योग बनत गेला.ज्या ग्रामीण भागामध्ये मोठे साखर कारखाने उभारले गेले त्या भागाच्या सामाजिक जीवनाचा केंद्रबिंदु ते कारखाने ठरले.तसेच त्यांच्या आर्थिक वाढ व विकासाचे सुद्रधा ते मुख्य केंद्र ठरले.कै. यशवंतराव चव्हाण यांनी कृषी औद्योगिक समाजाची कल्पना मांडली व त्यास मुर्तस्वरुप देण्यासाठी सहकारी क्षेत्रास राजश्रय,प्रोत्साहन व प्रतिष्ठा मिळवून दिली.सहकारी साखर कारखानदारीस लागणारा कर्जपुरवठा सढळ  हाताने करण्यात येऊ लागला. त्याच बरोबर उसाच्या शेतीसाठी कालव्याद्वारे पाणीपुरवठयाची सोय केली. आज महाराष्ट्रामध्ये सहकारी साखर कारखाने झपाटयाने विकास पावत आहेत.

महाराष्ट्रात 1960 नंतर सहकारी साखर कारखानदारीमध्ये मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे.परंतु याचा जास्त फायदा हा पश्चिम महाराष्ट्राला झालेला दिसुन येतो.मात्र इतर विभागात आवश्यक तेवढा विकास झालेला नाही.त्यामुळे इतर विभागांचाही औद्योगिक विकास होणे गरजेचे आहे.मराठवाडयामध्ये शेतीचा विकास होण्यासाठी शेतक-यांना नगदी पीकांकडे वळविणे आवश्यक आहे.त्यासाठी ग्रामीण भागामध्ये कृषीवर आधारित उद्योग सुरु करणे आवश्यक आहे.हे लक्षात घेऊन कै. अंकुशराव टोपे साहेबांनी जालना जिल्हयातील अंबड तालुक्यात जिल्हयातला पहिला साखर कारखाना सहकारी तत्वावर 'समर्थ सहकारी साखर कारखाना ' या नावाने 1982 साली स्थापन केला. अंबड तालुक्यातील शेतक-यांचे उत्पन्न वाढावे  त्यांच्या राहणीमानांचा दर्जा सुधारावा व एकंदरीत तालुक्याच्या विकासात महत्वाची भुमीका या कारखान्याच्या माध्यमातुन बजावली जात आहे. जालना जिल्हयात एकुण 6 साखर कारखाने आहेत. त्यांची स्थापना व तालुका यांची माहिती खालील तक्यामध्ये दिलेली आहे.

### तक्ता क्र.1 :  जालना जिल्हयातील साखर कारखाने व स्थापना

| अ.क्र. | स्थापना | तालुका | साखर कारखान्याचे नाव |
|---|---|---|---|
| 1. | 1982 | अंबड | समर्थ सहकारी साखर कारखाना |
| 2. | 1994 | भोकरदन | रामेश्वर सहकारी साखर कारखाना |

| | | | |
|---|---|---|---|
| 3. | 1995 | जालना | जालना सहकारी साखर कारखाना |
| 4. | 2006 | परतूर | बागेश्वरी सहकारी साखर कारखाना |
| 5. | 2009 | घनसावंगी | सागर सहकारी साखर कारखााना |
| 6. | 2010 | घनसावंगी | समृदधी साखर कारखाना |

स्त्रोत :-साखर संचालक विभागीय कार्यालय,औरंगाबाद.

तक्ता क्र.1 मध्ये जालना जिल्हयातील एकुण 6 साख्र कारखाने दिसुन येताात. सर्वात जुना साखर कारखाना म्हणुन अंबड तालुक्यातील समर्थ सहकारी साखरकारखाना अंकुशनगर याची ओळख आहे. माजी खासदार कै. अंकुशराव टोपे साहेबांच्या नेतृत्वाखाली सन 1982 मध्ये या कारखान्याची मुहुर्तमेढ रोवली गेली.जिल्हयातील हा पहिला सहकारी साखर कारखाना होय. यानंतर भोकरदन येथील सिपोरा येथे सहकारी तत्वावर कारखाना स्थापन करण्यात आला.जालना जिल्हयातील हे दोन जुने सहकारी तत्वावर चालणारे कारखाने आहेत त्यानंतर जालना शहराजवळ रामनगर येथे जालना सहकारी साखर कारखाना सन 1995 मध्ये स्थापन करण्यात आला. या शिवाय कै.अंकुशराव टोपे साहेबांनी समर्थ सहकारी साखर कारखान्याच्या मोठया व्यापामुळे त्याचे विभाजन करुन सागर सहकारी साखर कारखाना तीर्थपुरी येथे स्थापन केला. आता हा कारखाना कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखाना युनीट नं.2 नावाने चालवला जात आहे.

महाराष्ट्रामध्ये साखर कारखानदारीमध्ये मोठया प्रमाणात वाढ झालेली दिसते.महाराष्ट्रामध्ये साखर उद्योग हा एक महत्वाचा तसेच राज्याच्या अर्थव्यवस्थेचा प्रमुख घटक असलेला शेतक-यांच्या व कामगाराच्या जिव्हाळयाचा उद्योग आहे.परंतु आज मितीला शासनाची उदासीनता, मंदी, वाढता उत्पादन खर्च , नैसर्गिक परिस्थिती व ऊसाची कमतरता, अकार्यक्षम न्यायस्थापन,अनावश्यक कामगार भरती व वारेमापखर्च इत्यादीमुळे कारखाान्यांचे आजारपण वाढले परिणामी काही कारखाने दिवाळखोरीत निघाले आहेत. राज्यात सहकारी साखर कारखाना संदर्भात अशा स्वरुपाचची चिंताजनक परिस्थिती असताना देखील कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखान्याने या परिस्थितीतील सामोरे जात स्थापनेपासुन आजपर्यंत देश व राज्य पामळीवरचे एकूण 22 पारितोषिके उत्कृष्ट व्यवस्थापन व उत्कृष्ट आर्थिक व्यवस्थापनाच्या संदर्भात मिळवले आहेत. त्यामुळे प्रस्तुत शोधनिबंधात या कारखान्याच्या साखर उत्पादन व उतारा प्रवृत्तीचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे :-

1.कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखान्याच्या साखर उत्पादनाचा अभ्यास करणे.

2. कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखान्याच्या उतारा प्रवृत्तीचा अभ्यास करणे.

3. कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखान्याचे साखर उत्पादन व उतारा प्रवृत्ती यातील संबंध तपासणे.

## संशोधन पध्दती :

प्रस्तुत शोध निबंधात वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्वधतीचा वापर करण्यात आला आहे. वापरण्यात आलेली माहिती पुर्णत :द्वितीयक स्वरुपाची असुन तो कारखान्याच्या वार्षिक अहवालातुन संकलित करण्यात आली आहे. प्रस्तुत शोध निबंधात कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखान्याच्या 2006-07 ते 2015-16 या दहा वर्षाच्या कालखंडातील साखर उत्पादन व उतारा प्रवृत्तीचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

## कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखान्याचे ऊस गाळप,साखर उत्पादन व उतारा प्रवृत्ती :-

कोणताही उद्योग स्थापन करण्यामागे त्या उत्पादकाचे प्रमुख उद्विष्टे महत्तम नफा मिळविणे हे असते.त्यासाठी अधिकाधिक उत्पादन करणे गरजेचे असते म्हणजेच साखर उद्योगामध्ये देखील साखरेचे उत्पादन अधिक करुन त्याची विक्री करुन नफा महत्तम करता येतो.परंतु त्यासाठी कारखाना क्षेत्रात मोठया प्रमाणात कच्चा माल म्हणजे ऊस उपलब्ध असणे आवश्यक आहे.त्याचबरोबर अत्याधुनिक यंत्रसामग्री व त्या यंत्रसामग्रीचा पुरेपुर कार्यक्षम वापर करणे आणि साखरेचा उतारा पण चांगला असला पाहिजे तेव्हाच कारखान्याचे उद्विष्ट पुर्ण होईल. त्याचबरोबर उत्पादित साखरेची योग्य दराला विक्री होणे देखील आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय

बाजारपेठेचा विचार केला तर भारत हा ब्राझील नंतर साखर उत्पादीत करणरा दुस-या क्रमाकांचा देश आहे.परंतु भारताचे परकीय व्यापार धोरण,राजकीय हस्तक्षेपामुळे तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारतीय साखरेची किंमत जास्त असल्यामुळे साखरेची निर्यात मोठया प्रमाणात करु शकत नाही.

कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखान्याचे ऊस गाळप,साखर उत्पादन व उतारा प्रवृत्ती विषयी माहीती खाली तक्ता क्र.2 मध्ये दर्शविलेली आहे.

**तक्ता क्र. 2**

**कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखाना ऊस गाळप साखर उत्पादन व उतारा प्रवृत्ती**

| वर्ष | एकूण ऊस गाळप ( लाख क्विंटल) | एकूण साखर उत्पादन (लाख क्विंटल) | साखर उतारा (टक्केवारी) |
|---|---|---|---|
| 2006-07 | 74.49 | 8.58 | 11.50 |
| 2007-08 | 72.07 | 8.05 | 11.17 |
| 2008-09 | 45.59 | 5.21 | 11.44 |
| 2009-10 | 63.06 | 7.18 | 11.40 |
| 2010-11 | 55.74 | 5.87 | 10.55 |
| 2011-12 | 59.41 | 6.54 | 11.01 |
| 2012-13 | 43.86 | 4.56 | 10.41 |
| 2013-14 | 45.88 | 4.79 | 10.44 |
| 2014-15 | 57.82 | 6.03 | 10.44 |
| 2015-16 | 48.21 | 4.95 | 10.28 |

स्त्रोत :-कर्मयोगी अंकुशराव टोपे स.स.सा.का.वार्षिक अहवाल 2006-07 ते 2015-16

वरील तक्ता क्र.2 मध्ये कारखान्याने केलेले ऊसाचे गाळप साखर उत्पादन व उतारा प्रवृत्तीची आकडेवारी दिलेली आहे.2006-07 च्या गळीत हंगामात कारखान्याने 74.49 लाख क्विंटल ऊसाचे गाळप करुन 8.58 लाख क्विंटल साखरेचे उत्पादन केले व साखर उतारा 11.50 टक्के राहिलेला आहे.2006-07 नंतर ऊस गाळप व साखर उत्पादन घटलेले दिसुन येते.2012-13 मध्ये सर्वात कमी ऊस गाळप झालेला आहे. तो म्हणजे 43.86 लाख क्विंटल व साखर उत्पादन 4.56 लाख क्विंटल झालेले आहे.

या दहा वर्षाच्या कालखंडाचा विचार केलार तर सर्वात जास्त ऊस गाळप व साखर उत्पादन 2006-07 हंगामात झालेले दिसते. त्यानंतर ऊस गाळपात 2006-07 च्या तुलनेत प्रत्येक वर्षी घट झालेली दिसुन येते त्याच प्रमाणे साखर उत्पादनात देखील घट झालेली दिसुन येते. साखर उत्पादनाचा विचार केला तर 2006-07 मध्ये साखर उतारा 11.50 टक्के होता तो 2015-16 मध्ये 10.28 टक्के झालेला दिसुन येतो. म्हणजेच 206-07 नंतर साखर उता-यामध्ये 2011-12 चा अपवाद वगळता सातत्याने घट झालेली निदर्षनास येते. साखर उत्पादन व उतारा यातील सहसंबंध कार्लपिअरसन पद्वतीने तपासला असता यामध्ये धन सहसंबंध दिसुन आला.तो 0.7इतका आहे.

## निष्कर्ष व शिफारशी :-

कारखान्याचा साखर उत्पादनात वाढ होण्यासाठी कार्यक्षेत्रात ऊस लागवडीखालील क्षेत्र वाढवणे,आधुनिक यंत्रसामुग्रीची उभारणी करणे, ऊस लागवडीचालील क्षेत्र उत्पादन व उत्पादकता वाढविण्यासाठी कारखान्यांनी ऊस पीक कर्ज,आडसाली -पूर्वहंगामी ऊस लागवड, ठिबक सिंचन संच वाटप आधुनिक कृषी अवजारांचे वाटप ,खते व किटकनाशकांचे वाटप,माती-पाणी

परिक्षण यासारख्या योजना राबविणे आवश्यक आहे.साखर उतारा वाढविण्यासाठी सुधारित बेणे वाटप, ऊसाची जमिनीलगत तोडणी करणे,ऊस तोडणी व ऊस गाळप यातील वेळ कमी करणे, प्रतिहेक्टरी ऊस उत्पादन वाढवण्यास प्रोत्साहीत करावे.शेतक-यांनी ठिबक सिंचन पद्वतीचा वापर करुन उपलब्ध पाण्याद्वारे ऊस लागवडी खालील क्षेत्रात वाढ करावी. यामुळे ऊस लागवड क्षेत्रात व ऊस उत्पादकतेत वाढ होईल. सुधारीत ऊस जातींची लागवड, आवश्यक खते व किटकनाशके, योग्य प्रमाणात पाणी,पुरेशी मेहनत व तण नियंत्रण इ.द्ववारे प्रतिएकरी ऊस उतदनात वाढ करता येईल यासाठी शेतक-यांना प्रशिक्षण, मेळावे, मार्गदर्शन शिबीरे त्याचबरोबर माहितीपट गावोगावी दाखवुन ऊसाच्या उत्पादनासंदर्भात शेतक-यांना माहिती दयावी.

साखर कारखाना कृषी विद्यापीठे, ऊस विकास संस्था, कृषीतज्ञ यांच्यात समन्वय साधुन साखर उद्योगासबंधी दीर्घकालीन धोरणांचा अवलंब करावा. तसेच शेतक-यांना शेतीसाठी वीजेची उपलब्ध करुन दयावी त्याच बरोबर कार्यक्षेत्रात आवश्यक ठिकाणी लहान मध्यम व मोठया सिंचन प्रकल्पाची उभारणी करण्यासाठी पुढाकार घ्यावा.

## संदर्भ :-

1.तुपे सु.दा.(2000) "महाराष्ट्रातील साखर उद्योग स्थिती आणि समस्या "अर्थ संवाद खंड 23,अंक 4

2.Nikam G.A.(2006) "Indian Sugar Industry a Comparative study " Shree Publisher & Distributors, New Delhi.

3. तायडे पुष्पा (2002) "विदर्भातील साखर उद्योगाचे अर्थशास्त्र " श्री.मंगेश प्रकाशन, नागपूर

4.डॉ. राजाळे व्ही.एल., केंधळे व्ही.एन. (2017) "जालना जिल्हयातील साखर कारखान्यांचा भौगोलिक अभ्यास "Cosmos Multidisciplinary Research E-Journal April 2017 Volume II ] Issue ,III.

5. वार्षिक अहवाल कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखाना. 2006-07 ते 2015-16